REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# दक्षिण आशियातील दहशतवाद: स्वरूप, समस्या आणि उपाय



**प्रा. कल्याण वरळे**
**राज्यशास्त्र विभाग प्रमुख, महिला कला महाविद्यालय**
**बीड. (महाराष्ट्र)**

## प्रस्तावना:—

दहशतवादाने आज संपूर्ण जगाला विळखा घातला आहे. दहशतवाद म्हणजे हिंसेच्या मार्गाने लोकांमध्ये दहशत पसरवून कायदेशीर किंवा बेकायदेशीर मार्गाने आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी सरकारवर दबाव आणणे होय.[१] शस्त्रे किंवा हत्यारांचा वापर करून राजकीय उद्दिष्टप्राप्तीसाठी जनतेमध्ये भीती किंवा असुरक्षीततेचे वातावरण निर्माण करणे हे दहशतवाद्यांचे उद्दिष्ट असते. दहशतवाद ही एक मानसशास्त्रीय संकल्पना असून आत्यंतिक भीतीची भावना निर्माण करणे हा दहशतवादाचा मुख्य गाभा आहे. दहशतवाद्यांचा संबंध दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या लोकांशी नसतो तर हल्ल्यामुळे बळी गेलेल्या लोकांचे नातेवाईक, मित्र मंडळी व इतर हजारो लोकांच्या मनात जी भीती व दहशतीची भावना तयार होते त्याच्याशी दहशवाद्यांचा संबंध असतो.

पारंपरिक दहशतवादाचे स्वरूप अतिशय मर्यादित होते. विशिष्ट ध्येय किंवा उद्दिष्टाने प्रेरित होवून एका विशिष्ट प्रदेशात आपली दहशत निर्माण करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा दहशतवाद्यांचा हेतू दिसत होता. त्यासाठी ते राजकीय नेत्यांची हत्या, महत्वाच्या व्यक्तींचे अपहरण किंवा विमान अपहरण अशा तंत्रांचा अवलंब करत असल्याचे निदर्शनास येत होते. मोठ्या प्रमाणात जीवित हानी व वित्त हानी करण्याचा दहशतवाद्यांचा मानस दिसत नव्हता मात्र ११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेच्या न्यूयॉर्क व पेंटागॉन शहरावरील दहशतवादी हल्ल्याचे स्वरूप बघता आंतरराष्ट्रीय स्तरावरील दहशतवादाचे विक्राळ व विकृत स्वरूप आपल्या निदर्शनास येईल. आज मोठ्या प्रमाणात दहशतवादी कारवायांच्या माध्यमातून जीवित व वित्तहानी घडवून आणून आपला प्रभाव दृढ करण्याचा जगभरातील दहशतवादी संघटनांचा मानस दिसतो आहे. जगातील सर्वच भागात दहशतवादी संघटनांचे प्रस्थ असून दक्षिण आशिया मात्र दहशतवादी संघटनांचे माहेरघर झाले आहे. अनेक आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांचे अस्तित्व पाकिस्तान, अफगाणिस्तान तसेच बांग्लादेशात दिसून येते. वाढत्या दहशतवादी कारवायांमुळे या प्रदेशाचा विकास खुंटला आहे. दक्षिण आशियातील दहशतवादाचे स्वरूप प्रकट करणे व दहशतवाद प्रतिबंधात्मक उपाय सुचविणे या उद्देशाने सदर शोध निबंधाचे काम संशोधकाने हाती घेतले आहे.

## दक्षिण आशियातील दहशतवाद:—

दक्षिण आशिया हा आशिया खंडातील एक भौगोलिक प्रदेश आहे. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश व श्रीलंका हे भारतीय उपखंडातील प्रमुख देश तसेच नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान व मालदीव ह्या आठ देशांना साधारणपणे दक्षिण आशियाई देश मानले जाते. दक्षिण आशियाचा विस्तार ५.१ दशलक्ष चौ.की.मी. असून आशिया खंडातील ११.५१ टक्के तर जगाच्या ३.४ टक्के भूक्षेत्र दक्षिण आशियाने व्यापले आहे. दक्षिण आशियाची लोकसंख्या १७४.९ करोड असून जगातील सर्वाधिक लोकसंख्या व लोकसंख्येची घनता असलेला प्रदेश म्हणून दक्षिण आशियाची ओळख आहे. आशियातील जवळपास ४० टक्के तर जगातील २४ टक्के लोकसंख्या दक्षिण आशियात निवास करते.[२]

वर्तमान परिस्थितीत दक्षिण आशिया अस्थिर व अशांत बनला असून त्याची मूळ येथील सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीत सापडतात. डॉमिनीक मोइझी या फ्रेंच विचारवंताच्या मते आज आंतरराष्ट्रीय राजकारणाचे केंद्र पश्चिम युरोपकडून आशिया खंडाकडे स्थलांतरीत झाले आहे. वसाहतवादी शोषणाला बळी पडलेली आशियाई राष्ट्रे आपल्या आर्थिक प्रगतीच्या आधारावर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आहेत भारत चीन जपान अशा आशियाई राष्ट्रांची प्रगती जगाला धक्का देणारी आहे. बहुसंख्य आशियाई राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरण आणि विकासाची कास धरल्यामुळे त्यांना शांततेची आवश्यकता होती. परिणामी त्यांनी परस्परांमधील राजकीय संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडविण्यावर भर दिला होता. तथापि, २०१० नंतर आशिया खंडातील आर्थिक, राजकीय तसेच संरक्षण विषयक स्थिती झापाट्याने बदलू लागली. आज आशिया खंड कमालीचा अस्थिर व अशांत बनला आहे. आशियाई राष्ट्रांचा संरक्षणावरील खर्चात वाढ झाली असून शस्त्रास्त्र स्पर्धा निर्माण झाली आहे. राजकीय प्रश्नांनी गंभीर स्वरूप धारण केले असून आशिया खंडातील स्थिती युध्दसम झाली आहे.[३] याला दक्षिण आशियातील दहशतवादी कारवाया जबाबदार असल्याचे आपल्या निदर्शनास येईल.

दक्षिण आशियातील दहशतवादाने या प्रदेशाचा विकास खुंटला असून दहशतवादाच्या प्रतिबंधासाठी सर्वच दक्षिण आशियाई राष्ट्रे प्रतिबध्द आहेत. म्हणूनच १९८५ साली दक्षिण आशियाई देशांनी प्रादेशिक, राजकीय व वाणिज्य संबंध बळकट करण्यासाठी सार्कची स्थापना केली व २००४ साली दक्षिण आशियाई मुक्त व्यापार कराराला मान्यता दिली. मात्र शेजारी राष्ट्रांच्या द्विपक्षीय संबंधात आजही कटूता असून दहशतवाद नियंत्रणात सातत्याने अपयश येत आहे.

दक्षिण आशियातील दहशतवादाला तीन प्रकारात वर्गीकृत करता येईल.

१. धार्मिक मूलतत्ववादातून उदयास आलेला दहशतवाद — यात पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांग्लादेश व भारतातील काश्मिरमध्ये धर्माच्या नावावर दहशत पसरविणाऱ्या दहशतवादी संघटनांचा समावेश होतो.
२. डाव्या विचारसरणीचे उग्रवादी — यात भारतातील नक्षलवादी दहशतवाद तसेच नेपाळमधील माओवादी दहशतवादाचा समावेश करता येईल.
३. अलिप्ततावादातून उदयाला आलेला दहशतवाद — यात भारतातील खलिस्तानी, उल्फा व बोडो तसेच काश्मिर मधील दहशतवादाचा समावेश करता येईल.

## दक्षिण आशियातील दहशतवादाचे स्वरूपः—

### १) भारतातील दहशतवादाचे स्वरूपः—

भारत स्वातंत्र्योत्तर काळापासूनच दहशतवादाच्या समस्येने ग्रस्त आहे. भारतात फाळणी आणि काश्मीरचा प्रश्न दहशतवादाशी संबंधीत आहे. पाकिस्तानी लष्कर आणि दहशतवादी संघटना भारतात जाणीवपूर्वक अस्थिरता निर्माण करण्यासाठी दहशतीचा वापर करत आहे.

भारतातील दहशतवाद वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येतो. काश्मीर मध्ये अनेक आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना सक्रिय आहेत. काश्मिरमधील धार्मिक दहशतवाद ही भारतापुढील सर्वात मोठी समस्या आहे. १९८७ नंतर काश्मिरमध्ये दहशतवादी कारवायात वाढ झालेली दिसून येते. अलगाववादी संघटनांनी जिहादच्या नावाखाली काश्मिरमध्ये दहशतवाद फोफावला. कट्टरतावादी इस्लामिक संघटना या दहशतवादाचे मुळ आहे.[४] हिजबुल मुजाहिद्दिन, जम्मू काश्मिर लिबरेशन फ्रंट, अल कायदा यासारख्या संघटना व शेजारची मुस्लिम राष्ट्रे यांच्या मदतीने काश्मिर भागात दहशत पसरविली जात आहे.

त्याचप्रमाणे भारतात प्रादेशिक दहशतवादी संघटनांमध्ये खलिस्तान मुक्ती आघाडी, त्रिपुरा राष्ट्रीय आघाडी, आसामी युनाटेड लिबरेशन फ्रंट मणिपुर यासारखे विविध गट कार्यरत आहेत. पंजाबमध्ये खलिस्तान हे वेगळे राज्य अस्तित्वात यावे यासाठी भिंडरवाल यांच्या नेतृत्वाखाली खलिस्तानी दहशतवाद उदयास आला. १९८४—८५ मध्ये या दहशतवादाने पंजाबमध्ये उग्र स्वरूप धारण केले होते. पंजाबमधील तत्कालीन पोलीस प्रमुख यांनी १९९३—९४ मध्ये दहशतवादाच्या प्रतिबंधासाठी जे उपाय सुचविले त्याचा अवलंब राज्य सरकारने केल्यामुळे पंजाबमधून खलिस्तान चळवळ पुरस्कृत दहशतवाद संपुष्टात आली.[५]

त्याचप्रमाणे नक्षलवादी दहशतवाद ही देखील भारतापुढील एक प्रमुख समस्या आहे. भारतातील नक्षलवादी चळवळ ही चीन मधील माओवाद प्रणीत आहे. साम्राज्यशाहीचा अंत करून साम्यवादाचा जगभर प्रसार करण्याच्या उद्देशाने नक्षलवादी चळवळ सुरू झाली. भारतीय केंद्रीय गृह मंत्रालयाद्वारे प्राप्त आकडेवारीनुसार २० राज्यातील २२३ जिल्हे नक्षलवादाने प्रभावित आहेत.[६]

## २) पाकिस्तानातील इस्लामी दहशतवादः—

दक्षिण आशियातील पाकिस्तानला दहशतवादाचे माहेरघर संबोधता येईल. पाकिस्तानातील दहशतवादाला अंतर्गत आणि बाह्य दहशतवाद अशा दोन प्रकारात वर्गीकृत करता येते. पाकिस्तानात धार्मिक उग्रवाद प्रबळ असून त्यामुळे पाकिस्तानचे अंतर्गत तसेच बाह्य राजकीय संबंधांवर परिणाम झाला आहे. पाकिस्तानमधील देशांतर्गत दहशतवादी संघटनांमुळे देशाची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था धोक्यात आली आहे. त्यामुळेच पाकिस्तानने तहरीक—ए—तालिबान, लष्कर—ए—झांगवी, महदी मिलिशिया यासारख्या स्थानिक दहशतवादी संघटनांवर बंदी लादली आहे. याशिवाय मौलाना सुफी मोहम्मद यांनी स्थापन केलेली दहशतवादी संघटना तेहरिक—ए—नफाज—ए—शरियत—ए—मोहम्मदी ही संघटना देखील पाकिस्तानमध्ये सक्रीय आहे.[७]

त्याचप्रमाणे पाकिस्तानातील आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेमध्ये अल्—कायदा या संघटनेचा समावेश करता येईल. तर राज्य पुरस्कृत दहशतवादी गटात क्वेटा सुरा तालिबान, हिब्ज—ई—इस्लामी, लष्कर—ए—तोयबा, जमात—उद—दवा आणि जैश—ए—मोहंम्मद, हरकत—उल—मुजाहिद्दिन या संघटनांचा उल्लेख करता येईल. सिपाई—ए—साहिबा आणि सिपाई—ए—मुहम्मद या संघटना पाकिस्तानातील सांप्रदायिक दहशतवादाला जबाबदार आहेत.[८] पाकिस्तानात धार्मिक मूलतत्ववादही अधिक प्रबळ असून दक्षिण आशियात पाकिस्तान हा धार्मिक मूलतत्त्ववाद आणि धार्मिक दहशतवादाचे केंद्र बनला आहे. दक्षिण आशियात हिंसाचार घडवून आणणाऱ्या दहशतवादी संघटनांच्या सदस्यांना पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण मिळत आहे.'पाकिस्तानातील हक्कानिया मदरसा हा एक दहशतवादी निर्माण करण्याचा मोठा कारखाना बनला असून या हक्कानिया मदरश्यामध्ये दहा लाख विद्यार्थ्यांना उग्रवादी इस्लामचे शिक्षण दिले जात आहे. या हक्कानी संस्थेद्वारे काश्मीर मिळविण्यासाठी भारताविरूध्द जिहाद पुकारले आहे.'[९]

अलिकडे पाकिस्तानातील दहशतवादाने व्यापक रूप धारण केले आहे. पाकिस्तानात २००३ पासून ते २०१७ पर्यंत झालेल्या विविध दहशतवादी हल्ल्यांमध्ये एकूण ६२,५७९ लोकांचा मृत्यू झाला आहे.[१०] पाकिस्तानी शासनाच्या आकडेवारीनुसार २००१ ते २०१० या काळात पाकिस्तानचे ६८ बिलीयन डॉलर्सचे नुकसान झाले आहे.[११] यावरून पाकिस्तानातील दहशतवादी घटनांची व्यापकता आपल्या लक्षात येईल.

## ३) अफगाणिस्तान मधील दहशतवादः—

*भारताच्या शेजारी अफगाणिस्तान हा डोंगराळ प्रदेश असून ते एक मागासलेले राष्ट्र आहे. १९७९ मध्ये सोव्हिएत रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण करून हा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. परंतु हिंसाचार आणि अराजकता यामुळे रशियाला या प्रदेशातून माघार घ्यावी लागली. अफगाणिस्तानमध्ये मूलतत्त्ववाद (Fundamentalism) जास्त पगडा आहे. मुलतत्ववाद म्हणजे इस्लामची जी मुख्य तत्वे आहेत, कुराण, धर्मग्रंथ तसेच परंपरा यांचा त्यांना आधार आहे त्याप्रमाणे सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करणे होय.*[१२]

अफगाणिस्तानमध्ये अल—हरकत—उल मुजाहिद्दीन, लष्कर—ए—तोयबा, अल्—कायदा अशा काही दहशतवादी संघटना सक्रिय आहेत. ११ सप्टेंबर २००१ रोजी अल्—कायदा या अतिरेकी संघटनेच्या दहशतवाद्यांनी अमेरिकेच्या चार विमानांचे अपहरण करून ते वर्ल्ड ट्रेड सेंटरवर तसेच एक पेन्टागॉनच्या इमारतीवर आदळवले. या हल्ल्यात हजारो लोक मारली गेली. त्यानंतर अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये आपले सैन्य घूसवून २ मे २०११ रोजी अल्—कायदा संघटनेचा प्रमुख ओसमा बिन लादेनला ठार केले.[१३] *अफगाणिस्तानमध्ये दहशतवाद फोफावण्यासाठी तेथील अस्थिर सामाजिक, आर्थिक व्यवस्था देखील कारणीभूत आहे. आर्थिक मागासलेपणामुळे या भागात मादक द्रव्यांची तस्करी तसेच त्यांच्या उत्पादनाला*

*प्रोत्साहन मिळत गेले. मादक द्रव्यांच्या तस्करीत अफगाणिस्तान आघाडीवर असून या व्यवहारातून मिळणारा पैसा दहशतवादी संघटना दहशत पसरविण्यासाठी करत आहेत.*

### ४) बांग्लादेशातील दहशतवादः—

दक्षिण आशियात पाकिस्ताननंतर दहशतवाद पसरविण्यात बांग्लादेशाचा मोठा वाटा आहे. आपल्या उदरनिर्वाहाच्या दृष्टिने अनेक बांगलादेशी तरूण भारतात येत आहेत तर काही इस्लामच्या नावाखाली भारताविरोधी दहशतवादी गटांमध्ये सामील होत आहेत. बांग्लादेश सरकारने दहशतवादी संघटनांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळेच राजकीय संरक्षणाखाली हरकत—उल—जिहाद—अल—इस्लामी बांगलादेश (हुजी—बी) आणि जमात—उल—मुजाहिद्दीन बांग्लादेश (जे एम बी) यासारखे काही हिंसक अतिरेकी गट उदयास आले आहेत. तालीबानी विचारसरणीनुसार चालणाऱ्या या दहशतवादी गटांनी बांग्लादेशचे सामाजिक, आर्थिक, राजकीय जीवन अस्थिर केले आहे. २०१२ ते २०१५ या तीन वर्षाच्या काळात बांग्लादेशात ७५२ दहशतवादी कारवायांत ९५८ लोक जखमी तर १३८ लोक मृत्यूमुखी पडले आहेत.[१४] बांग्लादेशामध्ये इस्लामिक राजवट स्थापन करणे हे या दहशतवादी संघटनांचे उद्दिष्ट असून अफगाणिस्तानमधील तालीबानी राजवटीच्या अस्तानंतर १५० हून अधिक दहशतवादी संघटनांनी बांग्लादेशामध्ये आश्रय घेतल्याचे दिसून येईल.

### ५) श्रीलंकेतील दहशतवादः—

श्रीलंकेत प्रामुख्याने ‘लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम’ अर्थात लिट्टे या संघटनेद्वारे वांशिक राष्ट्रवादी दहशतवाद तसेच जनता विमूक्ती पेरामूना (JVP) या साम्यवादी पक्षाद्वारे पुरस्कृत डाव्या विचारसरणीतून आलेला दहशतवाद सक्रिय होता. श्रीलंकेत बहुसंख्य सिंहली आणि अल्पसंख्यांक तमिळ यांच्यात जो तमिळ संघर्ष सुरू होता तो जवळपास चार दशके चालला. श्रीलंकेतील तमिळ संघर्ष म्हणजे तमिळ भाषीय व्यक्तींनी वेगळा देश मागण्यासाठी केलेला उठाव होता. हा लढा लिट्टे प्रमुख प्रभाकरणच्या मृत्यूनंतर संपुष्टात आला. शिवाय श्रीलंकन सरकारने यापुढे तमिळांबाबत दुजाभाव बाळगला जाणार नसल्याचे आश्वासन दिल्यामुळे हा संघर्ष कमी झाला आहे.

श्रीलंकेतील लिट्टेचा प्रभाव कमी झाल्यामुळे श्रीलंकेतील हिंसाचाराला आळा बसला आहे. १९ मे २००९ रोजी लिट्टे प्रमुख प्रभाकरणला श्रीलंकन सैन्याने मारले. २००९ नंतर २०१८ साला पर्यंत श्रीलंकेत दहशतवाद किंवा हिंसाचारामुळे केवळ ३ लोकांचाच मृत्यू झालेला दिसतो. २००० ते २००९ पर्यंत मात्र बळींची संख्या ही ४१,३३८ इतकी दिसते.[१५] म्हणजेच लिट्टे संघटनेचा बिमोड केल्यानेच श्रीलंकेतील दहशतवादी कारवायांना आळा घालण्यात श्रीलंकन सरकारला यश आले आहे.

### ६) नेपाळमधील दहशतवादः—

भारताच्या शेजारी नेपाळ राष्ट्रात राजेशाही पध्दत होती. आर्थिक दृष्टीने मागास असलेल्या या देशात भारताप्रमाणेच लोकशाही शासन पध्दती असावी यासाठी राजेशाही विरूध्द बंड पुकारले त्यातून अनेक दहशतवादी कारवाया नेपाळमध्ये घडून आलेल्या दिसतात. नेपाळमध्ये प्रामुख्याने माओवादी संघटनांद्वारे दहशतवाद पसरविला जात आहे. कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (माओवादी) ही नेपाळ मधील एक राजकीय पार्टी असून त्याची स्थापना १९९४ मध्ये झाली. पुष्पा कमल दहल हे या संघटनेचे वर्तमान अध्यक्ष आहेत. संघटनेची उभारणी चीनचे कम्युनिस्ट नेते माओ—त्से—तुंग यांच्या विचारसरणीवर झालेली आहे. प्रतिगामी सरकार उलथवून लोकांची सत्ता प्रस्थापित करणे हे या पक्षाचे प्रमुख ध्येय होते.

नेपाळमध्ये जनतांत्रीक तेराई मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय सुरक्षा सेना, जी एफ पीरामधीर सेना, मदहेशराष्ट्रीय जनतांत्रिक पार्टी ही भूमिगत तेराई संघटना, तेराई आर्मी ही अज्ञात संघटना सक्रिय असून नेपाळ मध्ये दहशत आणि हिंसाचार पसरविण्यासाठी या संघटना जबाबदार असल्याचे दिसून येते. नेपाळमधील माओवादी संघटनांनी राजेशाही विरोधात जे बंड पुकारले त्याला शेवटी यश आले असून राजे ग्यानेंद्र यांना पायउतार व्हावे लागले व २००८ मध्ये लोकशाही व्यवस्था स्थापन करावी लागली. त्यामुळे

२००७—०८ सालापासून नेपाळमधील हिंसाचारात घट झाली असून मागील पाच वर्षात तर एकही व्यक्ती हिंसाचाराला बळी पडलेला दिसत नाही.

*अशा प्रकारे दक्षिण आशियात दहशतवाद आणि हिंसेचे स्वरूप आहे. या दहशतवादामुळे दक्षिण आशियाच्या विकासाला खिळ बसली असून मागील काही वर्षात दक्षिण आशिया अधिक अस्थिर बनला आहे. दक्षिण आशियात प्रामुख्याने धार्मिक मुलतत्त्ववादातून दहशतवादी कारवाया मोठ्या प्रमाणात घडून येत असून अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांग्लादेश या मुस्लीम राष्ट्रांमध्ये अशा कट्टरवादी इस्लामिक दहशतवादाचे प्रस्थ आहे. धर्माच्या आधारे काही धर्मांध लोकांनी जगभरात हा धार्मिक दहशतवाद पसरविला आहे. या इस्लामिक दहशतवादाला दहशतवादी 'जिहाद' असे म्हणतात. तरूणांना धर्माच्या नावाखाली भूलविले जाते. धार्मिक तत्त्वांचा चूकिचा अर्थ सांगून त्यांना गैरकृत्ये करण्यास भाग पाडले जाते. वास्तविक पाहता 'जिहाद' म्हणजे संघर्ष करणे, तो संघर्ष स्वतःच्या विचारांशी असतो. यात कुठेही निष्पाप लोकांचा बळी घेतला जावा असा उल्लेख नाही. जिहाद म्हणजे स्वतःच्या आतल्या अवगुणांशी संघर्ष होय मात्र दहशतवाद्यांद्वारे जिहाद म्हणजे अइस्लामिक लोकांशी संघर्ष असा घेतला गेला. त्यातून इतर धर्मियांविषयी तरूणांच्या मनामध्ये द्वेष निर्माण केला गेला व त्यांच्या कत्तली करण्यास भाग पाडले जाते. हे अमानवीय कृत्य असून त्याला वेळीच पायबंद घातला गेला पाहिजे.*

*दहशतवादामुळेच दक्षिण आशियाची वाटचाल अधोगतीकडे होत आहे. म्हणूनच दहशतवादाला वेळीच पायबंद घालणे आवश्यक आहे. त्यामुळे दक्षिण आशियातील देशांमध्ये प्रादेशिक पातळीवर सहकार्य वृध्दींगत होण्यासाठी तसेच वाढत्या दहशतवादाला पायबंद घालण्यासाठी दक्षिण आशियाई प्रादेशिक सहयोग संघटना (South Asian Association for Regional Cooperation-SAARC) अर्थात सार्क संघटनेची स्थापना केली गेली. परंतु या संघटनेलाही आपला फारसा प्रभाव पाडता आलेला नाही.*

### दहशतवादाविरूध्द लढा व प्रतिबंधात्मक उपायः—

दक्षिण आशियात दहशतवादाविरूध्द लढा सुरू करणारे भूतान हे पहिले राष्ट्र आहे. डिसेंबर २००३ मध्ये या देशाने प्रथमच भारतीय बंडखोरांविरूध्द कारवाई करण्याचा निर्णय घेतला. या बंडखोर गटांचे भूतानमध्ये अनेक ठिकाणी तळ होते व त्याठिकाणी त्यांचे प्रशिक्षण सुरू होते. भूतानच्या राजाने स्वतः या गटांविरूध्द कारवाई करून बंडखोरांचे उच्चाटन केले. या कृतीमुळे दहशवादाचे संपूर्णतः उच्चाटन झालेले नसले तरीही भूतानमधील माओवादी संघटनांना भूतान सरकारला पायबंद घालता आला आहे व एका समृध्द लोकशाहीची बिजे त्याठिकाणी रोवली गेली आहेत. बांग्लादेशच्या दृष्टीकोनातही बदल झाला असून सत्तेवर आल्यानंतर दोनच दिवसात बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी बांग्लादेशात दहशतवादी गटांना थारा देणार नसल्याचे नमूद केले. तसेच दहशतवादी कारवायांसाठी बांग्लादेशच्या भूमीचा वापर करू देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.[१६]

भारतानेही दहशतवादाच्या प्रतिबंधासाठी काही प्रभावी उपाय योजना केलेल्या आहेत. १९८५ मध्ये दहशतवाद विरोधी कायदा Terrorist and Disruptive Activities Act (TADA) तसेच २००२ मध्ये दहशतवाद प्रतिबंधात्मक कायदा Prevention of Terrorism Act, 2002 (POTA) पारीत करण्यात आले. मुंबईतील २६ नोव्हेंबर २००८ च्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत सरकारच्या गृहमंत्रालयाने दहशतवादाच्या प्रभावी प्रतिबंधासाठी काही संस्थात्मक बदल करण्याची विनंती केलेली होती. त्यानुसार राष्ट्रीय अन्वेषण विभागाची (NIA) स्थापना करण्यात आली.

पाकिस्तान दहशतवादाचे केंद्र असूनही पाकिस्तान सरकारने दहशतवाद विरोधी ठोस असे उपाय केलेले नाहीत. २००८ मध्ये दहशतवादाच्या प्रतिबंधासाठी मात्र राष्ट्रीय दहशतवाद प्रतिबंधक प्राधिकरण (The National Counter Terrorism Authority - NACTA) ची स्थापणा केली होती. परंतु हे प्राधिकरण कोणाच्या अखत्यारित असले पाहिजे. सैन्य की मुलकी प्रशासन संबंधीच्या वादामुळे सन २०१३ पर्यंत पाकिस्तान सरकारने NACTA संबंधीचा अध्यादेश पारित केलेला नव्हता. मे २०१४ मध्ये

NACTA ने राष्ट्रीय अंतर्गत सुरक्षा धोरण प्रसिध्द केले त्यात मदरशांमधील सुधारणा, सैनिकांच्या क्षमता वृध्दींगत करणे, दहशतवाद विरोधी फोर्स तयार करणे, प्रादेशिक सहकार्य या सारख्या उपायांवर भर दिलेला दिसतो.[१७]

दक्षिण आशियातील दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी प्रादेशिक सहकार्याशिवाय पर्याय नाही जसे श्रीलंकेने भारत चीनच्या मदतीने लिट्टे या दहशवादी संघटनेचा बिमोड केला. तशीच मदत प्रत्येक देशातील दहशवादी संघटनेच्या उच्चाटनासाठी परस्परांनी करण्याची आवश्यकता आहे. दहशतवादाच्या प्रतिबंधासाठी दक्षिण आशियाई देशांनी केलेले वैयक्तिकरित्या प्रतिबंधात्मक उपाय अपुरे आहेत. दक्षिण आशियाई देशांनी आपली अंतर्गत दहशतवाद विरोधी यंत्रणा केवळ मजबूत करून दहशतवादाला शह देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजच्या दहशतवादाचे आंतरराष्ट्रीय स्वरूप बघता त्याच्या प्रतिबंधासाठी सहकार्यात्मक द्विपक्षीय संबंध अधिक महत्वाचे ठरू शकतात. म्हणूनच दक्षिण आशियाई देशांनी सार्क संघटनेच्या माध्यमातून सहकार्यात्मक दृष्टीकोनातून प्रदेशातील दहशतवाच्या प्रतिबंधासाठी १९८७ मध्ये दहशतवाद प्रतिबंधात्मक करारावर स्वाक्षऱ्या केल्या. मात्र दुर्देवाने हा करार केवळ कागदोपत्रीच राहिला. याच्या अपयशाची प्रामुख्याने दोन कारणे आहेत. एकतर कोणत्याही देशाच्या राजकीय नेतृत्वाने या कराराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रामाणिक प्रयत्न केलेले नाहीत. आणि दोन म्हणजे या कराराद्वारे देशातील मुलभूत प्रश्न न सोडविता दहशतवादी संघटनांच्या उच्चाटनासाठी सैनिकीय कारवायांवर अधिक भर दिला. एखादा देश जेव्हा दहशतवादी कारवाया म्हणजे आपला अंतर्गत प्रश्न असून आपल्या पध्दतीने त्याचे निराकरण करू अशी भूमिका जेव्हा घेतो तेव्हा सार्क संघटनेच्या दहशतवाद प्रतिबंधात्मक कराराचे मात्र तो सोईस्करपणे उल्लंघन करतो. आणि सार्कच्या बाबतीत हेच झालेले आहे. दहशतवादाविरूध्दच्या लढ्याच्या बाबतीत दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये एकी आणि सहमती दिसत नाही त्यामुळेच दहशतवादाचा नायनाट प्रदेशातून शक्य होत नाही.

## सारांशः—

आज संपूर्ण दक्षिण आशिया दहशतवादाच्या छायेखाली वावरत आहे. इराक व उत्तर कोरियानंतर दक्षिण आशिया हे जगातील सर्वात खतरनाक व संवेदनशील स्थान आहे असे पाश्चात्य विचारवंतांचे मत आहे. आज भारत—पाकिस्तान संघर्ष, काश्मिर संघर्ष, श्रीलंकेतील लिट्टे संघर्ष, नेपाळमधील माओवादींचा संघर्ष, बांग्लादेशमधील इस्लामी कट्टरतावाद अशा घटनांमुळे दक्षिण आशियातील परिस्थिती सातत्याने संघर्षमय व अस्थिर बनलेली आहे. आर्थिकदृष्ट्याही हा प्रदेश मागासलेला असून जगातील सर्वात मागास समजल्या जाणाऱ्या उपखंडापैकी एक आहे. जागतिक व्यापारातील त्यांचा वाटा अत्यल्प आहे. गरीबी, बेकारी, निम्न जीवनस्तर, दहशतवाद, धार्मिक मूलतत्ववाद, निरक्षरता, लोकसंख्या वाढ यांसारखे काही समान प्रश्न या उपखंडातील देशांचे आहेत. त्यावर सहकार्याच्या माध्यमातून तोडगा काढणे शक्य आहे. आजवर अनेक व्यापार संघटनांनी हे सिध्द करून दाखविले आहे. संपूर्ण जग हे आर्थिक आणि व्यापारी एकीकरणाच्या दिशेने प्रवास करत असताना दक्षिण आशियाई देशांनी यातून बोध घेण्याची आवश्यकता आहे.

## संदर्भसूचीः—

१. पुरवार, हरीमोहन (२०११) 'आतंकवाद और उसका वैदिक उपचार' यादव, वीरेन्द्र सिंह (संपा) 'आतंकवाद का अन्तर्राष्ट्रीय परिदृश्यः चुनौतियॉ और समाधान की दिशाएँ' नई दिल्लीः ओमेगा पब्लिकेशन्स, पृ. क्र. १२९
२. South Asia - https://en.wikipedia.org/wiki/South_Asia
३. http://therohithake.blogspot.in/2012/11/blog-post_785.html
४. भारती, लक्ष्मीना (२०११) ' भारत में आतंकवादी गतिविधियॉ : समस्या एवं समाधान ' यादव, वीरेन्द्र सिंह (संपा) *'आतंकवाद का अन्तर्राष्ट्रीय परिदृश्यः चुनौतियॉ और समाधान की दिशाएँ '* नई दिल्लीः ओमेगा पब्लिकेशन्स. पृ. क्र. ९६ ते ९९

५. सिंहल, एस. जी. (२००६) 'भारत की विदेश नीति' आगरा: लक्ष्मी नारायण अग्रवाल. पृ. क्र. ३९१.
६. http://jcil.lsyndicate.com/wp-content/uploads/2016/08/Naxalism-Final-Abhishek-Kumar.pdf
७. https://fas.org/sgp/crs/row/pakmil.pdf
८. http://pgil.pk/wp-content/uploads/2014/04/Dialogue_July_September2011_224-241.pdf
९. शरण, शंकर (२००९) 'जिहादी आतंकवाद' नई दिल्ली: राजपाल एण्ड सन्स, पृ. क्र. १२
१०.http://www.satp.org/satporgtp/countries/pakistan/database/casualties.htm
११.https://en.wikipedia.org/wiki/Terrorism_in_Pakistan
१२.उदगांवकर, म. न. (२००७) 'एकविसाव्या शतकातील दहशतवाद', पुणे: डायमंड पब्लिकेशन्स, पृ. क्र. १२८.
१३.https://en.wikipedia.org/wiki/Death_of_Osama_bin_Laden
१४.https://en.wikipedia.org/wiki/Number_of_terrorist_incidents_by_country
१५.http://www.satp.org/Datasheets.aspx?countries=srilanka
१६.Anand Kumar, Ed. (2012) 'The Terror Challenge in South Asia and Prospect of Regional Cooperation',INSTITUTE FOR DEFENCE STUDIES & ANALYSES NEW DELHI, Published by,PENTAGON PRESS, New Delhi. pp. 4
१७.http://mackenzieinstitute.com/counter-terrorism-policy-measures-a-critical-analysis-of-pakistans-national-action-plan/